CCKN- Climate Change Knowledge Network in Indian Agriculture **प्रकल्पातंर्गत जर्मनी येथील दि २१.ते दि २८.फेब्रुवारी २०१६या कालावधीतील प्रशिक्षण कार्यक्रमाच्या विदेश दौऱ्यास मान्यता ..**

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१५/प्र.क्र.८/३-अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २५ जानेवारी, २०१६

<u>वाचा</u> : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. परदौ.१४१४/प्र.क्र४६/का-११, दि.२९.१२.२०१४
२) अतिरिक्त आयुक्त, केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय यांचे पत्र क्र १२-५/२०१५/आरएफएस-३,दि.२३.१०.२०१५, व पत्र समक्रमांक दि.६.११.२०१५ व दि.११.१.२०१६

<u>शासन निर्णय:-</u>

CCKN -Climate Change Knowledge Network in Indian Agriculture हा प्रकल्प भारत सरकार व जर्मनी यांच्या संयुक्त विद्यमानाने राबविला जात असून, या प्रकल्पाचा पथदर्शी प्रकल्प राज्यातील अहमदनगर व पुणे या जिल्हयांमध्ये राबविला जात आहे. हवामान बदलाचा शेती उत्पन्नावर मोठया प्रमाणावर परिणाम होत असल्यामुळे या प्रकल्पाव्दारे सदर माहिती कृषि विभाग यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांना देणे त्यादृष्टीने कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार करणे ही या प्रकल्पाची उद्यीष्टे आहेत.

या प्रकल्पातंर्गत जर्मनी येथे दि.२१ फेब्रुवारी,२०१६ ते दि.२८ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीतील प्रशिक्षण कार्यक्रमासाठी CCKN-IA चे काम पाहणारे नोडल ऑफ़ीसर तसेच Rainfed Area Development आणि Climate change and sustainable agriculture, Monitoring, Modelling and Networking (CCSA-MMN) या कार्यक्रमाचे काम पाहणा-या ३ अधिका-यांचे नामनिर्देशन करण्याबाबत केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाने कळविले होते.

२. तदनुसार CCKN -Climate Change Knowledge Network in Indian Agriculture या प्रकल्पातंर्गत जर्मनी येथील दि.२१ फेब्रुवारी,२०१६ ते दि.२८ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या विदेश दौरा शिफारस समितीच्या मान्यतेने खालील अधिकाऱ्यांच्या नावाची शिफारस करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) श्री.उदय देशमुख, प्राचार्य रामेती, पुणे (CCKN प्रकल्पाचे Consortium Partner)
२) श्री.शिवाजी जगताप, उपसंचालक, आत्मा सामेती तथा नोडल अधिकारी (CCKN प्रकल्प)
३) श्री.सु.सं.धपाटे, उप सचिव, कृषि व पदुम विभाग, (CCKN प्रकल्प) मंत्रालय, मुंबई

३. प्रस्तुत प्रशिक्षण दौऱ्याचा सर्व खर्च हा CCKN-IA यांच्या वतीने करण्यात येणार असून, त्यामध्ये राज्याला कोणताही आर्थिक भार सोसावा लागणार नाही. सदर प्रशिक्षण दौऱ्यासाठी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांनी या विदेश प्रशिक्षण दौऱ्यानंतर प्रशिक्षण दौऱ्याचा विस्तृत अहवाल या विभागास तसेच सामान्य प्रशासन विभागास सत्वर सादर करावा.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२५१२४७१३८९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vikram Nivrutti Dhamal

Digitally signed by Vikram Nivrutti Dhamal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=10d36944a4b86eab516b1b70183709c5fb570cfdf5a52755adfef51ed380b836, cn=Vikram Nivrutti Dhamal
Date: 2016.01.25 12:52:18 +05'30'

(विक्रम ढमाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति-

१) श्री. उदय देशमुख, प्राचार्य रामेती, पुणे
२) श्री. सु.सं.धपाटे, उप सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
३) श्री. शिवाजी जगताप, उपसंचालक, आत्मा सामेती, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,

प्रत-

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य,पुणे
४. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई
५. महालेखापाल, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२ नागपूर
६. संचालक आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
७. महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड धरमपेठ, नागपूर
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई.
९. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन ११, मंत्रालय,मुंबई ३२.
१०. वित्त विभाग कार्यासन व्यय-१/ अर्थ-३, नियोजन विभाग कार्यासन १४३१, मंत्रालय,मुंबई ३२.
११. निवड नस्ती (का.३ अे)

* * *